राज्यात Amended BharatNet Program च्या अंमलबजावणीसाठी Special Purpose Vehicle (SPV) स्थापन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : No.ABP-SPV-2026/C.R.69/IT (E-1608676)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २३ जून, २०२६

**प्रस्तावना:**

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. केंद्रीय दूरसंचार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०१.०४.२०२५ रोजी Amended BharatNet Program (ABP) संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत BharatNet Phase-I व Phase-II च्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन पुढील अंमलबजावणीबाबत चर्चा करण्यात आली.

सदर बैठकीत कार्यक्रमाच्या पुढील अंमलबजावणीसाठी सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने दि. ११.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये Admin DBN यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने BharatNet Phase-I व Phase-II चा सखोल आढावा घेऊन, Amended BharatNet Program राबविण्याबाबतचा अहवाल तयार करुन आपला अंतिम अहवाल दि. ०१.१०.२०२५ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना सादर केला. मा. मुख्य सचिवांच्या मान्यतेनंतर सदर अहवाल शासनाने मान्य केला असल्याबाबत दि. १३.१२.२०२५ रोजीच्या शासनपत्रान्वये माहिती तंत्रज्ञान विभागाकडून प्रशासक, डिजिटल भारत निधी यांना कळविण्यात आले आहे.

केंद्रशासनाच्या दुरसंचार मंत्रालयाने दि. २८.०१.२०२६ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनाव्दारे Amended BharatNet Program (ABP) राबविण्यास महाराष्ट्र शासनास मान्यता दिली आहे. तसेच राज्य-नेतृत्वाखालील मॉडेल (State-led Model अंतर्गत Amended BharatNet Program (ABP) च्या अंमलबजावणीसाठी दिनांक ०१.१०.२०२५ रोजी केंद्रशासनाच्या दुरसंचार मंत्रालयाकडून मंजूर करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वास अनुसरुन राज्यात Amended BharatNet Program राबविण्यासाठी Special Purpose Vehicle (SPV) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्यात Amended BharatNet Program (ABP) प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्य शासन व Department of Telecommunications (DoT) यांचे समप्रमाणात प्रतिनिधित्व असलेली **“महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (MDIL)”** या नावाने Special Purpose Vehicle (SPV) स्थापन करण्यात येत आहे.

**अ) प्रस्तावित SPV ची रचना पुढीलप्रमाणे :**

| अ. क्र | रचना | |
|---|---|---|
| १. | प्रशासक Digital Bharat Nidhi (USOF) | अध्यक्ष |
| २. | अ. मु. स./ प्रधान सचिव / सचिव महसूल व वन विभाग | सदस्य |
| ३. | अ. मु. स./ प्रधान सचिव / सचिव ग्राम विकास विभाग | सदस्य |
| ४. | अ. मु. स./ प्रधान सचिव / सचिव वित्त विभाग | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव/सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग) | सदस्य |
| ६. | मुख्य कार्यकारी अधिकारी, SPV (राज्य शासन नियुक्त) सदस्य-सचिव | सदस्य-सचिव |
| ७. | केंद्र शासनाकडून नामनिर्देशित केलेले वरिष्ठ अधिकारी (०४ ) | ४ सदस्य |

**आ) SPV ची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे असेल:**

१) भारतनेट फेज १ व २ एकत्रित करुन ABP चा SCOPE OF WORK/BOQ निश्चित करणे.

२) प्रकल्प व्यवस्थापन संस्था ( PMA ) ची नियुक्ती करणे.

३) ABP प्रकल्पाचा DPR (Detailed Project Report) आणि RFP (Request for proposal) तयार करणे.

४) निविदा प्रक्रिया राबवून प्रकल्प अंमलबजावणी संस्थेची (Project Implementing Agencies) निवड करणे.

५) नियतकालिक आढावा बैठक घेऊन प्रकल्प सनियंत्रण व देखरेख करणे.

२. भारतनेट फेज-१ व फेज-२ मधील सध्या अस्तित्वात असलेले भारतनेट नेटवर्क “As-is-where-is” तत्वावर नवीन SPV कडे हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. भारतनेट फेज-१ व फेज-२ अंतर्गत उद्भवलेल्या किंवा प्रलंबित असलेल्या कोणत्याही खटल्यांपासून तसेच दायित्वांपासून या SPV ला आर्थिक व कायदेशीर संरक्षण (Immunity) प्रदान करण्यात येत आहे.

i. भारतनेट फेज-१ अंतर्गत उद्भवलेल्या किंवा प्रलंबित असलेल्या कोणत्याही खटल्यांची तसेच दायित्वांबाबत जबाबदारी BSNL यांची राहील.

ii. भारतनेट फेज-२ अंतर्गत उद्भवलेल्या किंवा प्रलंबित असलेल्या कोणत्याही खटल्यांची तसेच दायित्वांबाबत जबाबदारी MahaIT/राज्य शासन यांची राहील.

४. सदर SPV बाबत सर्व वैधानिक प्रक्रीया (Memorandum of Assosiation (MoA) Articles of Assosiation (AoA) इ.) इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभागामार्फत पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय मा. राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक १६/०६/२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०६२३१२२४५८८२११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA
MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.06.23 12:25:47 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई.
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
११) शासनाचे सर्व मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
१२) मा.  प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई
१५) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१६) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१७) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९) सर्व पोलीस आयुक्त
२०) सर्व विभागीय आयुक्त
२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२४) सर्व जिल्हाधिकारी
२५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२६) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी
२७) आयुक्त, इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय, मुंबई
२८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई.
२९ ) निवडनस्ती/मातं.